वि.दि.दावा क्र. १५४/२०२३
मंदाबाई ठाकरे वि. रामराव
निशाणी क्र.१२१

प्रतिवादी क्र. ३ तर्फे साक्षीदार क्र.१ हंसराज तायवाडे,
मी शपथेवर सांगतो की,

**साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादी क्र.३ तर्फे विद्वान विधीज्ञ ए.एम.काशीकर यांच्यातर्फे सुरु–**

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी दिनांक १८/०८/२००२ ची नोटीस आणि विशेष दिवाणी दावा क्र. ७०२/२००२ या दाव्याची प्रत दाखल केली आहे. सदर कागदपत्रांना अनुक्रमे नि.क्र.१२५ आणि १२६ देण्यात येत आहे.
सरतपास पुर्ण.

**साक्षीदाराचा उलटतपास वादीतर्फे त्याचे सुविद्य विधीज्ञ सौ. एस.डी.गभने यांद्वारे –**

३. मंदाबाई ही माझी मोठी बहिण आहे आणि रंगराव हे मंदाचे पती आहेत. तसेच या दाव्यातील प्रतिवादी हे माझे भाउ आणि बहिणी आहेत. माझ्या संमतीशिवाय वाटण्या झालेल्या आहेत. वाटणीमध्ये मोठा भाउ केवळराम याला हिस्सा देण्यात आला नव्हता. सर्वे नं.३७/२ हा केवलराम यांनी स्वतः विकत घेतलेला आहे. खंडाळा येथील घरामध्ये सर्व जाण माझ्याजन्माच्या आधीपासुन एकत्र राहत होते. झींगाबाई टाकळी येथील घराचे बक्षीसपत्र करतांना, बहिणींना सांगितलेले नव्हते. दावा मिळकत ही वडिलोपार्जीत आहे आणि सर्व बहिणींचा आणि भावाचा समान हक्क आहे. मला वाटणीद्वारे मिळालेली जमिन सर्वे नं.३८/२ हा मी वाकलकोंडे याला विकली होती आणि वाकलकोंडे यांनी सदर जमिन ही प्रतिवादी क्र.१० ला विकली होती. हे म्हणणे खरे नाही की सदर जमिन विकण्याचा मला अधिकार नव्हता.

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी क्र.१, २, ८ आणि ९ यांचेतर्फे त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. पालीवाल यांद्वारे –**

४.  माझे शिक्षण बारावी आहे. माझे प्रेसचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की मी न्यायालयात नेहमी रंगराव यांच्यासोबत येत होतो. या दाव्यात मी लेखी कैफियत दाखल केली असुन ती मी वाचलेली आहे. साक्षीदाराला त्याचे शपथपत्रातील कलम ३, ४,५,६,७,८,९,१० मधील मजकुर वाचुन दाखविण्यात आला, साक्षीदाराने सांगितले की सदर मजकुर हा त्याच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. सदर मजकुर लेखी कैफियतीमध्ये न लिहिण्याचे कारण मध्ये माझा आणि माझ्या पत्नीची घटस्फोटाचे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे मला, प्रस्तुत प्रकरणामध्ये लक्ष देता आले नाही. मी सन २०२४ पासुन प्रत्येक तारखेला न्यायालयामध्ये हजर आहे. शपथपत्र हे रामटेकमध्ये तयार केले आहे. हे म्हणणे खरे आहे की रंगरावने तयार केलेल्या शपथपत्रावर मी सही केलेली आहे.

५.  हे म्हणणे खरे नाही की मी १२ वर्षाचा असल्यापासुन, केवलराम हे मला नागपुर येथे घेवुन गेले. हे म्हणणे  खरे आहे की त्यानंतर मला त्यांनी किराणा मालाचे दुकान १९९६ साली लावुन दिले. माझे शिक्षण आठवीपर्यंत झाल्यानंतर केवलराम मला नागपुर येथे घेवुन गेले होते. हे म्हणणे खरे आहे की किराणा मालाचे दुकाण आणि पुर्वीचे दुकान हे झिंगाबाई टाकळी येथील बिल्डींगमध्ये होते. साक्षीदाराला बक्षिसपत्र, दिनांक २१/०७/२०२० दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावर त्याची आणि त्यांच्या वडीलांची सही असुन, सदर बक्षिसपत्र माझ्या वडीलांनी झिंगाबाई टाकळी येथील मिळकतीबाबत माझ्या नावाने करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की बक्षिसपत्र हे तुषार आणि मोहण यांना देखिल झिंगाबाई टाकळी येथील दुस–या भागांचे, रामराव यांनी करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर बक्षिसपत्राच्या आधारे नगर पालिकेला तिघांचीही वेगवेगळी नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की बक्षिसपत्राबाबत मी आजतागायत कोणतीही हरकत नोंदविली नाही. हे म्हणणे खरे नाही की सन २०२० मध्ये मी बक्षिसपत्राबाबतची माहिती वादी यांना दिली. हे म्हणणे खरे आहे की सदर बक्षिसपत्रानुसार आम्हा तिघांचा वेगवेगळा ताबा आणि वहिवाट आहे.

६.  हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांनी सन २००५ मध्ये वादमिळकतीचे वाटप तिघा मुलांमध्ये करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की सदर वाटणीनुसार सातबारे वेगवेगळे झाले. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी माझ्या हिस्स्याच्या मिळकतीची विक्री

केलेली आहे. मी माझ्या हिस्स्याची मिळकत ही प्रथम विरु व्यवंकटराव यांना विकली त्यानंतर त्यानी शंकर चौरे यांना विकली. त्यानंतर शंकर चौरे यांनी प्रतिवादी क्र.१० ला विकली. सर्वप्रथम मी सन २०१९ मध्ये मिळकतीची विक्री केली होती. हे म्हणणे खरे आहे की मी मिळकत विक्री केल्यानंतर सदर मिळकतीचा ताबा हा विकत घेणा–या व्यक्तीला दिला होता. सदर ताबा मी हा सन २००५ मध्ये मिळालेल्या वाटणीनुसार, विकत घेणा–या व्यक्तीला ताबा दिला होता.

माझे वडील रामराव हे दिनांक २८/०२/२०२५ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील रामराव हे आमच्या कुटुंबाचे कर्ता पुरुष होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांची मानसिक परिस्थिती, ते मयत होतांना चांगली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की माझ्या वडीलांची मानसिक स्थिती माझी आई मयत झाल्यानंतर, २०२१ पासुन ढासळलेली होती. हे म्हणणे खरे आहे की सन २००५ मध्ये झालेली वाटणी अथवा मी विक्री केलेले क्षेत्र अथवा बक्षिसपत्राबाबत, कोणत्याही न्यायालयामध्ये, मला मान्य नाही म्हणुन दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की जसा वाटणीमध्ये मला ताबा मिळाला, तसाच इतर भावांना देखिल वाटणी प्रमाणे ताबा मिळालेला होता. हे म्हणणे खरे नाही की केवलराम यांना वडीलांनी दुसरी शेती विकत घेवुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की मी आज रोजी दाखल केलेल्या कागदपत्रांची माहिती मला पुर्वीच, माझी लेखी कैफियत दाखल करतांना होती. हे म्हणणे खरे आहे की बहिणी या मला ज्यावेळस सण असेल त्यावेळेस नेहमी भेटत असत. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शपथपत्रातील मजकुर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे वडील पुर्वी धान्य विक्रीचा व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे नाही की त्या उत्पन्नातुन, वडीलांनी झिंगाबाई टाकळी आणि खंडाळा येथील मिळकत ही विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या दाव्याला बळकटी यावी म्हणुन सदर शपथपत्र दाखल केले आहेत. रोहित आणि पंकज हे माझे पुतने आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी रोहित आणि पंकज यांच्या नावे सर्वे नं.८२ चे बक्षिसपत्र करुन दिले होते. सर्वे नं.४३ मध्ये माझे मालक म्हणुन नाव आहे. मी प्रत्येक वर्षी सातबारा काढतो. हे म्हणणे खरे

आहे की सर्वे नं.८२ च्या सातबारा उता–यावर रोहित आणि पंकज यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे नाही की वादीचा दावा मिळाकतीमध्ये हिस्सा असल्याचे मी खोटे सांगत आहे.

**साक्षीदाराचा उलटतपास उर्वरित प्रतिवादींतर्फे –**

उर्वरित प्रतिवादी गैरहजर,
सबब, उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

L.A.R. No. 106-2005

SARODE SANDEEP MARUTI
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.16 17:45:06 +0530

दिनांक १२.०३.२०२५ (एस.एम. सरोदे)
रामटेक दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.–II)